दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. २८ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १८५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

सौदी अरेबियाच्या संरक्षण मंत्रालयावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला

नवी दिल्ली: सौदी अरेबियातून एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. सौदी अरेबियामध्ये मंगळवारी (27 ऑक्टोबर) सौदी अरेबियाची राजधानी रियादमध्ये असलेल्या संरक्षण मंत्रालयालवर बॅलिस्टिक मिसाईल टाकून हल्ला करण्यात आल्याची बातमी समोर येत आहे. या हल्ल्याची जबाबदारी येमेनच्या हुती गटाने घेतली आहे. हुती गटाचा प्रवक्ता याह्या सारीने दिलेल्या माहितीनुसार, 'आमच्या गटाने आमचा शत्रू असलेल्या सौदी अरेबिया देशाच्या राजधानीवर रियाधमध्ये संरक्षण मंत्रालयावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला केला आहे.

2 हजारांच्या दंडाने उद्ध्वस्त झाले करिअर! इंजिनिअरची नोकरी गेली

मुंबई : गांजा पिण्याच्या एका किरकोळ आरोपात भरलेला अवघ्या २ हजार रुपयांचा दंड एका उच्चशिक्षित तरुणाच्या संपूर्ण करिअरसाठी जीवघेणा ठरला आहे. कंपनीच्या पार्श्वभूमी तपासात जुन्या गुन्ह्याची नोंद आढळल्यामुळे या तरुण आयटी अभियंत्याला आपली नोकरी गमवावी लागली आहे. या कायदेशीर संकटातून सुटका करून घेण्यासाठी आणि बोरीवली पोलिस ठाण्याच्या गुन्हेगार नोंदवहीतून आपले नाव कायमचे हटवण्यासाठी या तरुणाने थेट मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

थोडक्यात वार्ता

नांदेड–उधना विशेष रेल्वेगाडी रद्द

नांदेड : दक्षिण मध्य रेल्वेतर्फे हजूर साहिब नांदेड–उधना दरम्यान विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र, या गाड्यांना कमी प्रतिसाद मिळत असल्याने खालील विशेष रेल्वेगाड्यांच्या उर्वरित फेऱ्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गाडी क्र. 07605 हजूर साहिब नांदेड–उधना ह्या विशेष गाडी च्या 02 नोव्हेंबर ते 23 नोव्हेंबर 2026 दरम्यानच्या एकूण 04 फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत.

गाडी क्र. 07606 उधना–हजूर साहिब नांदेड ह्या विशेष गाडी च्या 03 नोव्हेंबर ते 24 नोव्हेंबर 2026 दरम्यानच्या एकूण 04 फेऱ्या रद्द करण्यात येत आहेत..

प्रवाशांनी वरील बदलांची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत करण्यात येत आहे.

चक्रीवादळ 'अर्नब'च्या पार्श्वभूमीवर नांदेड विभागातील 4 रेल्वेगाड्या रद्द

चक्रीवादळ 'अर्नब'च्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने खालील रेल्वेगाड्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

रद्द करण्यात आलेल्या रेल्वेगाड्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

1. रेल्वेगाडी क्र. 20809 – संबलपूर ते हजूर साहिब नांदेड
प्रवासाची तारीख (JCO): 30.10.2026 – रद्द
2. रेल्वेगाडी क्र. 17206 – काकीनाडा पोर्ट ते साईनगर शिर्डी
प्रवासाची तारीख (JCO): 28.10.2026 – रद्द
3. रेल्वेगाडी क्र. 17205 – साईनगर शिर्डी ते काकीनाडा पोर्ट
प्रवासाची तारीख (JCO): 29.10.2026 – रद्द
4. रेल्वेगाडी क्र. 12787 – नरसापूर ते नगरसुल
प्रवासाची तारीख (JCO): 28.10.2026 – रद्द

प्रवाशांनी वरील बदलांची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन त्यानुसार करावे. प्रवाशांनी रेल्वेच्या अधिकृत सूचना व अद्ययावत माहिती तपासत राहावे.

सिकंदराबाद –नगरसुल दरम्यान विशेष एकेरी रेल्वेगाडी

चक्रीवादळ 'अर्नब'च्या पार्श्वभूमीवर काही रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी सिकंदराबाद ते नगरसुल दरम्यान एकतर्फी विशेष रेल्वेगाडी क्र. 07099 चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

ही विशेष रेल्वेगाडी दिनांक 28.10.2026 रोजी सिकंदराबाद येथून 21.25 वाजता सुटेल आणि दिनांक 29.10.2026 रोजी नगरसुल येथे 09.55 वाजता पोहोचेल. ही रेल्वेगाडी नियमित रेल्वेगाडी क्र. 12788 नगरसुल–नाशिक रोडची सेवा सुरळीत करण्यासाठी तसेच प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने चालविण्यात येत आहे.

प्रमुख स्थानकांवरील वेळा:

स्थानक वेळ - सिकंदराबाद 21.25, दिनांक 28.10.2026 - कामारेड्डी 23.35- निजामाबाद 00.20 दिनांक 29.10.2026 - बासर 01.00 - धर्माबाद 01.15 - मुदखेड 03.00/03.02- हजूर साहिब नांदेड 03.10- पूर्णा जंक्शन 04.00- परभणी जंक्शन 04.35 - जालना 06.30 - छत्रपती संभाजीनगर 07.50- नगरसुल 09.55, 29.10.2026

शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली केल्यास फौजदारी कारवाई - देवेंद्र फडणवीस

दीड कोटी शेतकऱ्यांच्या खात्यांत दोन दिवसांत पाच हजार जमा होणार, पंप स्टोरेज प्रकल्प पर्यावरणपूरक असल्याची स्पष्टोक्ती

मुंबई : राज्यातील दुष्काळग्रस्त सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळाने मंगळवारी निधीसह मंजुरी दिली. येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यांत रक्कम जमा होण्यास सुरुवात होईल आणि कोणत्याही परिस्थितीत दिवाळीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांत पैसे पोहोचविण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचवेळी, मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांना दमदाटी करून कर्जवसुली करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांची तक्रार तातडीने नोंदवून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश सर्व जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासोबतच प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांबाबत सरकारची भूमिका मांडली. नांदेडमध्ये मायक्रोफायनान्स कंपनीच्या कर्जवसुलीशी संबंधित घडलेल्या घटनेमुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास दिल्याची तक्रार प्राप्त होताच ती नोंदवून घेऊन संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. मायक्रोफायनान्स कंपन्यांनी सक्तीने किंवा दमदाटी करून वसुली करू नये, यासाठी रिझर्व्ह बँकेला (आरबीआय) पत्र पाठविण्यात येणार आहे. अशा प्रकारे बळाचा वापर करणाऱ्या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करून गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा फडणवीस यांनी दिला.

दरम्यान, कर्जत परिसरातील प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पावरून सुरू असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी हा प्रकल्प पर्यावरणपूरक असल्याचे स्पष्ट केले. सौर आणि पवन ऊर्जेची निर्मिती सूर्यप्रकाश आणि वाऱ्याच्या उपलब्धतेवर अवलंबून असल्याने या स्रोतांमधून चोवीस तास वीज मिळत नाही. सायंकाळी सौरऊर्जेची निर्मिती होत नाही, तर वारा नसल्यास पवनऊर्जेचे उत्पादनही घटते. त्यामुळे वीज वितरण यंत्रणेवर परिणाम होतो. सौर आणि पवनऊर्जेतील चढ-



उतार संतुलित करून वीज वितरण यंत्रणा स्थिर ठेवण्यासाठी जगभरात पंप स्टोरेज तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या तंत्रज्ञानामुळे मागणीच्या उच्च काळात स्वच्छ, नवीकरणीय ऊर्जा उपलब्ध करून देणे शक्य होते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रस्तावित प्रकल्पाची क्षमता तीन हजार मेगावॅट आहे. एवढीच वीज कोळशापासून निर्माण केल्यास होणारे प्रदूषण भरून काढण्यासाठी २८ कोटी झाडांची आवश्यकता भासेल, असा दावा फडणवीस यांनी केला. पंप स्टोरेज प्रकल्पाला विरोध करून कोळशाच्या विजेवर अवलंबून राहिल्यास प्रदूषण कमी करण्याचे आव्हान अधिक गंभीर होईल, असे ते म्हणाले. प्रकल्पांतर्गत ९० हजार झाडे लावण्यात येत असून, प्रकल्पासाठी वापरलेल्या जमिनीच्या दुप्पट क्षेत्र वनविभागाला वनीकरणासाठी देण्यात आले आहे. याशिवाय प्रकल्पाच्या ठिकाणी आणखी ६० हजार झाडे लावण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. बॅटरी स्टोरेज प्रकल्पांच्या तुलनेत पंप स्टोरेज तंत्रज्ञान दीर्घकाळ उपयोगी ठरू शकते, असे सांगताना फडणवीस यांनी बॅटरीचे आयुष्य साधारण २५ वर्षे, तर पंप स्टोरेज प्रकल्पाचे आयुष्य सुमारे ८० वर्षे असल्याचे नमूद केले. बॅटऱ्यांसाठी चीनमधून आयात करावी लागते, तर पंप स्टोरेजसाठी आवश्यक तंत्रज्ञान भारतातच उपलब्ध आहे, असा दावाही त्यांनी केला. या प्रकल्पामुळे पुढील शंभर वर्षांच्या कालावधीत पर्यावरणाची हानी टाळण्यास मदत होईल आणि सध्या दिसणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांपेक्षा दीर्घकालीन लाभ कितीतरी पटींनी अधिक असतील, असे त्यांनी सांगितले. धरण बांधताना जलाशयासाठी वनजमीन वापरावी लागते, त्याच धर्तीवर पंप स्टोरेज प्रकल्पात जलसाठा निर्माण होणार असल्याने वनजमीन देण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. पंप स्टोरेज प्रकल्पासाठी कोणतीही जागा निवडता येत नाही. त्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य ठिकाणे शोधावी लागतात. पश्चिम घाटातील काही ठिकाणे या दृष्टीने अधिक अनुकूल असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारनेही पंप स्टोरेज प्रकल्पांचा समावेश हरित प्रकल्पांमध्ये केला असल्याचे नमूद करत, संपूर्ण आयुष्यकालाचा विचार केल्यास हे प्रकल्प पर्यावरणपूरक आणि कार्बन शोषणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात, असे फडणवीस म्हणाले. अभ्यास न करता विरोध - सौर आणि पवनऊर्जेतील चढ-उतार संतुलित करण्यासाठी चीनने आतापर्यंत ६० हजार मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज प्रकल्प उभारले असून, २०३० पर्यंत आणखी एक लाख ६० हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. यामुळे चीनमधील एकूण प्रस्तावित क्षमता सुमारे दोन लाख १० हजार मेगावॅट होईल. भारतालाही कोळशापासून होणाऱ्या प्रदूषणातून मुक्त व्हायचे असल्यास पंप स्टोरेज हा महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले.- या प्रकल्पाला होणारा विरोध पुरेसा अभ्यास न करता आणि माहिती न घेता केला जात असल्याची टीका फडणवीस यांनी केली. काही विरोधामागे राजकीय हेतू असल्याचेही त्यांनी म्हटले. मात्र, स्थानिक ग्रामस्थांच्या अडचणी आणि त्यांच्या मागण्या सरकार ऐकून घेण्यास तयार आहे. यापेक्षा अधिक चांगले आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान उपलब्ध असल्याचे कोणी दाखवून दिल्यास त्याचाही विचार केला जाईल. त्यानुसार गुंतवणूकदारांशी चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. पंप स्टोरेज प्रकल्पाविरोधातील भूमिकेची तुलना करताना फडणवीस यांनी आरे येथील मेट्रो-३ कारशेडचा दाखला दिला. आरे कारशेडसाठी झाडे तोडण्यावरूनही अशाच प्रकारे विरोध झाला होता. सर्वोच्च न्यायालयाने त्या प्रकरणात झाडांच्या आयुष्यभरातील कार्बन शोषणाच्या तुलनेत मेट्रो-३ सेवेमुळे ८० दिवसांत होणाऱ्या कार्बन बचतीचा संदर्भ देत प्रकल्पाला मान्यता दिली होती, असे त्यांनी सांगितले. पंप स्टोरेज प्रकल्पाचाही पर्यावरणीय परिणाम आणि दीर्घकालीन लाभ यांचा एकत्रित विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरणाच्या हिताच्या प्रकल्पाला विरोध करण्याऐवजी त्याचा अभ्यास करावा, असे आवाहन करत, ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी ते करत राहावे, अशी टीका फडणवीस यांनी केली.

पेट्रोलला पर्याय म्हणून E100 इंधनाला मंजुरी; केंद्राचे नवे नियम लागू!

मुंबई : रस्ते आणि वाहतूक महामार्ग मंत्रालयाने (MoRTH) केंद्रीय मोटार वाहन नियमांमध्ये सुधारणा अधिसूचित केल्या असून, फ्लेक्स फ्युएल वाहनांसाठी E85 सोबत E100 ला एक मंजूर इंधन पर्याय म्हणून जोडले आहे. E100 म्हणजे 100% इथेनॉल असलेले इंधन किंवा जवळपास 100% इथेनॉल असलेले इंधन. 23 ऑक्टोबर रोजी जारी करण्यात आलेली आणि 26 ऑक्टोबर रोजी शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झालेली ही अधिसूचना तात्काळ प्रभावाने लागू झाली आहे. 27 एप्रिल रोजी प्रसिद्ध झालेल्या मसुदा नियमांनुसार, मंत्रालयाने अंतिम अधिसूचना जारी करण्यापूर्वी जनतेच्या आक्षेपांचा आणि सूचनांचा आढावा घेतला होता.



फ्लेक्स फ्युएल वाहने इथेनॉल आणि पेट्रोलच्या कोणत्याही मिश्रणावर शुद्ध पेट्रोलपासून ते E100 पर्यंत चालण्यासाठी डिझाइन केलेली आहे. त्यातील ऑनबोर्ड सेन्सर्स त्यानुसार इंजिनचे पॅरामीटर्स समायोजित करतात. ब्राझील सध्या 2003 पासून जगातील सर्वात प्रगत फ्लेक्स फ्युएल कार्यक्रम चालवत आहे, जिथे उसापासून मिळवलेले इथेनॉल बहुसंख्य वाहनांना ऊर्जा पुरवते. तथापि, वापरकर्त्यांना सामान्यतः कमी इथेनॉल असलेले पेट्रोल खरेदी करण्याचा पर्याय असतो.

अधिसूचनेनुसार, उच्च इथेनॉल मिश्रणांसाठी डिझाइन केलेली आणि प्रमाणित केलेली वाहने E85 आणि E100 इंधन वापरू शकतात. पारंपरिक पेट्रोल वाहने, ज्यामध्ये देशव्यापी E20 मिश्रणावर चालणाऱ्या वाहनांचाही समावेश आहे. या नियामक सुधारणेमुळे वाहन उत्पादकांसाठी एक औपचारिक मार्ग तयार झाला आहे. कारण अनेक प्रमुख कार उत्पादक कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारतीय बाजारपेठेत E100 सुसंगत फ्लेक्स फ्युएल वाहने सादर करण्याच्या तयारीत आहेत.

E100 किंवा उच्च-इथेनॉल मिश्रणाकडे वळण्यासाठी वाहनात लक्षणीय फेरबदल करावे लागतात. इथेनॉलच्या क्षरणकारी गुणधर्मांना हाताळण्यासाठी इंधन प्रणालीचे घटक सील, इंधन वाहिन्या, इंजेक्टर अद्ययावत करावे लागतात आणि इथेनॉलच्या वेगळ्या ज्वलन वैशिष्ट्यांनुसार इंजिन व्यवस्थापन प्रणाली पुन्हा समायोजित करावी लागते. हे इंधन पेट्रोलपेक्षा प्रति लिटर सुमारे एक तृतीयांश कमी ऊर्जा देते, त्यामुळे मोठ्या इंधन टाकीच्या क्षमतेची किंवा अधिक वारंवार इंधन भरण्याची आवश्यकता असते.

विधिमंडळांच्या कामकाजासाठी 'एकसमान आदर्श नियम'

नवी दिल्ली: लोकसभा अध्यक्षांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे देशातील सर्व विधिमंडळांसाठी 'कार्यपद्धती आणि कामकाज संचालनाचे एकसमान आदर्श नियम' तयार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पाच सदस्यीय उच्चाधिकार समितीची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवार, 27 ऑक्टोबर 2026 रोजी नवी दिल्लीमध्ये पार पडणार आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर हे या समितीचे सन्माननीय सदस्य असून, या बैठकीत ते राज्याची भूमिका मांडणार आहेत.

दिल्ली विधानसभेकडे या बैठकीचे अध्यक्षपद असून त्यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार आहे. देशभरातील सर्व राज्य विधिमंडळांच्या कामकाजात सुसूत्रता आणि समानता आणण्याच्या दृष्टीने या समितीचे काम अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. यापूर्वी या पाच सदस्यीय समितीची बैठक 12 मे 2026 रोजी कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथे पार पडली होती. म्हैसूरच्या झालेल्या बैठकीत विस्तृत चर्चा झाल्यानंतर एकसमान नियमावलीच्या अहवालाचा मसुदा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते. समितीने दिलेल्या निर्देशानुसार, उत्तर प्रदेश विधानसभा सचिवालयाचे प्रधान सचिव प्रदीप कुमार

पंतप्रधान मोदींची युवराज अलोइस यांच्याशी महत्त्वपूर्ण द्विपक्षीय चर्चा

नवी दिल्ली : लिश्टनस्टाइनचे युवराज अलोइस आणि त्यांच्या पत्नी राजकुमारी सोफी सध्या भारताच्या अधिकृत राज्य दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे युवराज अलोइस यांची भेट घेऊन दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यावर सविस्तर चर्चा केली.

दिवसाच्या सुरुवातीला युवराज अलोइस आणि राजकुमारी सोफी यांनी राजघाट येथे जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यांनी समाधीवर पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली आणि अभ्यागत पुस्तिकेत (Visitors' Book) आपल्या भावना नोंदवल्या. या प्रसंगी केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जयंत चौधरी उपस्थित होते. भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही युवराज अलोइस यांची वैयक्तिक भेट घेतली. या भेटीदरम्यान उभय देशांतील वाढत्या सहकार्यावर सकारात्मक आणि महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

भेटीनंतर डॉ. जयशंकर यांनी सोशल मीडियावर ('X') लिहिले: "भारताच्या दौऱ्यावर आलेले लिश्टनस्टाइनचे युवराज अलोइस यांची भेट घेणे हा एक उत्तम अनुभव होता. भारत आणि ईएफटीए (EFTA TEPA) कराराच्या माध्यमातून आपल्या द्विपक्षीय संबंधांना एक नवी गती मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीमुळे दोन्ही देशांतील सहकार्य आणखी पुढे जाईल."

नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते युवराज अलोइस आणि राजकुमारी सोफी यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. "लिश्टनस्टाइनचा भारतामधील हा पहिलाच ऐतिहासिक राज्य दौरा आहे. भारत आमच्यासाठी किती महत्त्वाचा भागीदार आहे, हेच या दौऱ्यावरून स्पष्ट होते. एका वर्षापूर्वी अंमलात आलेल्या 'भारत-ईएफटीए व्यापार आणि आर्थिक भागीदारी कराराने' (TEPA) आपल्या संबंधांमध्ये नवा टप्पा गाठला आहे." त्यांनी पुढे नमूद केले की, "आम्ही या सहकार्याचा विस्तार करण्यास अत्यंत उत्सुक आहोत. विशेषतः नाविन्यता, प्रगत उत्पादन, आर्थिक सेवा शिक्षण आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये दोन्ही देश एकत्र येऊन मोठे काम करू शकतात.

"शाल जोडे"



हिंगोलीत काँग्रेसचा एल्गार; शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्याची मागणी

हिंगोली : शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, सरसकट कर्जमाफी करून बोनस जाहीर करावा, शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा करावा आणि 'वोट बचाओ, देश बचाओ' या मुद्द्यांसह विविध मागण्यांसाठी हिंगोली शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी होत शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले.

राज्यातील शेतकरी दुष्काळ, अतिवृष्टी, पीक नुकसान आणि आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. दुसरीकडे युवक बेरोजगारीने त्रस्त असून महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित



बिघडले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देऊन त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत तातडीने द्या!

शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान लक्षात घेता त्यांच्या खात्यावर हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत जमा करावी, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी आणि पिकांना योग्य मोबदला मिळण्यासाठी बोनस जाहीर करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शेतकऱ्यांना शेतीसाठी नियमित वीजपुरवठा मिळावा, तसेच शेतकरी हिताच्या विरोधात असल्याचा काँग्रेसचा आरोप असलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, अशीही मागणी करण्यात आली. 'वोट बचाओ, देश बचाओ' हा मुद्दा उपस्थित करत लोकशाही आणि नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारांच्या संरक्षणाची भूमिका काँग्रेसच्या वतीने मांडण्यात आली. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता शासनाने ठोस निर्णय घ्यावेत आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग

या आंदोलनात हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते, प्रदेश सचिव साहेबराव देवकते, माजी जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा सराफ, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष भास्कर राव पोले

काँग्रेस नेते जकी कुरेशी, माजी जिल्हा परिषद सदस्य शामराव जगताप, डॉ. रमेश शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष भगवानराव खंदारे, बाजीराव पाटील, बापूराव पाटील वडतकर, युवक प्रदेश सचिव बंटी नागरे, औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष ॲड. प्रदीप पोले जिल्हा सरचिटणीस किशोर जुमडे , विठ्ठल मोहनकर एकनाथ शिंदे, लक्ष्मण खोकले, चंदू प्यारेवाले, बाबू प्यारेवाले, दत्तात्रय भवर, अनुप नायक, सुरेश राठोड, अमन शेख, दीपक सोनुळे, जगदीश डाखोरे, संदीप बोडखे, विकी सराफ, रवी कोकरे, वाजिद बेग, पियुष सोनी, शेख शहाबाज, वंदनाताई इंगळे आणि दत्तराव जाधव यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष सुरूच ठेवणार

शेतकरी, बेरोजगार युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. शेतकऱ्यांना आर्थिक मदत, सरसकट कर्जमाफी, बोनस, नियमित वीजपुरवठा आणि शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासह विविध मागण्यांसाठी काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केली. जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवत राहणार, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करणार आणि प्रलंबित मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवणार, असा निर्धार यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

'अर्णब' चक्रीवादळाची धडक आणि 9 राज्यांसमोरील महासंकट

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले अत्यंत तीव्र चक्रीवादळ 'अर्णब' हे पूर्व किनारपट्टीच्या दिशेने वेगाने सरकत असून, २८ ऑक्टोबर रोजी दुपारपर्यंत आंध्र प्रदेशातील यानम, बापटला आणि विशाखापट्टणम दरम्यान किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी १३५ ते १५० किलोमीटरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. या वादळाची भीषणता लक्षात घेऊन प्रशासनाने आंध्र प्रदेश, ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड, बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशसह ९ राज्यांमध्ये सतर्कतेचा (Alert) इशारा दिला आहे. पूर्व किनारपट्टीवरील गंजम, गोपालपूर, काकीनाडा यांसारख्या भागांत सुरू झालेला मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा हा आगामी संकटाची भीषणता स्पष्ट करणारा आहे. या महासंकटाचा थेट फटका केवळ हवाई वाहतुकीलाच नव्हे, तर रेल्वे आणि रस्ते वाहतुकीलाही बसला आहे. ९० हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या असून अनेक विमानांची उड्डाणे थांबवण्यात आली आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून आंध्र प्रदेश, ओडिशा आणि झारखंडमधील शाळा व महाविद्यालयांना सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. ओडिशातील गंजम आणि आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथे प्रशासनाकडून सखल भागांतील नागरिकांना तात्काळ सुरक्षित स्थळी व पुनर्वसन केंद्रांमध्ये हलवण्यात येत आहे. मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्वतः निवारा केंद्रांची पाहणी केली जाणे हे प्रशासकीय सज्जतेच्या दृष्टीने समाधानकारक मानले पाहिजे. नैसर्गिक आपत्ती रोखणे मानवाच्या हातात नसले, तरी वेळेवर केलेले अचूक नियोजन आणि प्रभावी आपत्ती व्यवस्थापन यामुळे जीवितहानी शून्यावर आणणे शक्य आहे. 'अर्णब' चक्रीवादळामुळे केवळ किनारपट्टीवरील घरे, वीजवाहिन्या आणि पिकांचेच नुकसान होणार नाही, तर लाखोंच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांनी एकमेकांशी योग्य समन्वय ठेवून मदत व सुटका कार्य गतिमान ठेवणे आवश्यक आहे. नागरिकांनीही प्रशासनाच्या सूचनांचे तंतोतंत पालन करून अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. या निसर्गाच्या कोपाचा ताकदीने आणि शिस्तबद्धतेने मुकाबला करणे हेच आज संपूर्ण देशासमोरील मुख्य आव्हान आहे.

हर घर संत रविदास विचार-विकसित महाराष्ट्र' विशेष अभियान राज्यात व्यापक स्वरुपात राबवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त नोव्हेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत राबविण्यात येणारे 'हर घर संत रविदास विचार-विकसित महाराष्ट्र' हे विशेष अभियान राज्यात व्यापक स्वरूपात राबवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. संत रविदास महाराजांनी मांडलेले मानवता, समता, करुणा आणि दुःखमुक्त समाजाचे विचार तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावेत. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी यंत्रणा उभारावी, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विशेष अभियानाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रवींद्र चव्हाण, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक, सहसमन्वयक रविंद्र राठोड हे उपस्थित होते.

तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील,वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे आणि बार्टीच्या महासंचालिका डॉ. दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक सामाजिक आणि वैचारिक अभिसरण घडवून आणणे हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. संत रविदास महाराजांनी समता, मानवता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाची शिकवण दिली. हे विचार केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता समाजाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनावेत, यासाठी प्रयत्न करावेत. संत रविदास महाराजांच्या विचारांवर आधारित हे अभियान समाजातील सर्व घटकांना जोडणारे आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करणारे ठरेल.

विविध सामाजिक परंपरांमधील साम्यस्थळे आणि संतविचारांतील एकात्मतेचा संदेश समाजासमोर आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव अधिक दृढ करण्यासाठी या अभियानाचा उपयोग होईल. 'हिंद की चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध समाजघटकांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. त्याच धर्तीवर संत रविदास महाराजांच्या जयंती वर्षानिमित्त आयोजित उपक्रमांतूनही सामाजिक एकतेचा व्यापक संदेश दिला जावा. या अभियानासाठी संबंधित विभागांनी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा उभारून निर्धारित कार्यक्रम वेळेत पूर्ण करावेत. अभियानाच्या नियोजनापासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतच्या कामांचा सातत्याने आढावा घेण्यासाठी समिती गठित करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

कुंभमेळ्याच्या माध्यमातून व्यापक जनजागृतीवर भर – मंत्री गिरीश महाजन

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम नाशिक येथे होणार आहे. या कुंभमेळ्यात देशभरातून मोठ्या संख्येने भाविक व नागरिक सहभागी होतात. या पार्श्वभूमीवर संत रविदास महाराजांचे विचार आणि त्यांच्या जयंती वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या अभियानाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविता येईल. कुंभमेळ्यात येणाऱ्या दहा कोटींहून अधिक नागरिकांपर्यंत कमी खर्चात प्रभावीपणे जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव आहे. व्यापक जनसहभागाच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार करणे शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणार – मंत्री संजय शिरसाट

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकत्रितपणे पुरस्कार देऊन सन्मानित करावे. नागपूर विभाग, यवतमाळ तसेच राज्यातील अन्य भागांत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना विभागनिहाय मर्यादित न ठेवता एकाच व्यासपीठावर सन्मानित करण्याची यामागील संकल्पना आहे. या उपक्रमातून समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळेल, असे त्यांनी सांगितले.

संत रविदास महाराजांच्या नावाने विशेष योजना– मंत्री संजय सावकारे

वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी संत रविदास महाराजांच्या नावाने विशेष योजना सुरू करण्याची सूचना मांडली. या योजनेत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती तसेच नव्या क्षेत्रांत काम करणाऱ्या युवकांना आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद असावी. संत रविदास महाराजांचे साहित्य महाराष्ट्रात अधिक व्यापक स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी त्याचे संकलन, प्रचार आणि प्रसार करण्यासंदर्भात नियोजन करण्यात यावे. अनुसूचित जातीतील युवकांच्या नवकल्पना आणि उद्योजकीय उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी संत रविदास महाराजांच्या नावाने स्वतंत्र निधी किंवा विश्वस्त संस्था स्थापन करून आवश्यक आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्याची सूचनाही त्यांनी मांडली.

संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त विविध उपक्रम

संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी प्रास्ताविक केले. संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे सहसमन्वयक रविंद्र राठोड यांनी सादरीकरण करून उपक्रमांची माहिती दिली यामध्ये संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त नोव्हेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत 'हर घर संत रविदास विचार-विकसित महाराष्ट्र' हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.

विविध शासकीय विभाग आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या या अभियानात धार्मिक स्थळे, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, व्यापारी आणि कामगार संघटना, महिला बचतगट, युवक मंडळे, शासकीय क्षेत्रीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, महामंडळे आणि आरोग्य संस्थांचा सहभाग घेतला जाणार आहे. राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामस्तरावरील समित्यांच्या माध्यमातून अभियानाची अंमलबजावणी करण्यात येईल.

राज्यातील १ लाख ८ हजार १३९ शाळा, ५ हजार ८४१ महाविद्यालये, ६५ विद्यापीठे आणि ११ हजार १५० सार्वजनिक ग्रंथालयांना या अभियानाशी जोडण्याचे नियोजन आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, संतसाहित्य वाचन, संशोधन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील. यासोबतच विविध सामाजिक सेवा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांची रुजवण केली जाणार आहे.अभियानांतर्गत मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे, नेत्र व दंत तपासणी, महिला व बाल आरोग्य, पोषण, व्यसनमुक्ती आणि स्वच्छतेविषयी जनजागृती असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. श्रमाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी 'श्रमवीर सन्मान', कारागिरांच्या उत्पादनांचे प्रदर्शन, महिला आर्थिक स्वावलंबन आणि युवा सेवा सप्ताह यांचे आयोजन केले जाईल.

राज्यातील ६५० गावांमध्ये विचारसभा आणि वृक्षारोपणाचे नियोजन आहे. प्रत्येक जिल्ह्यात दोन प्रचार वाहनांच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार केला जाणार आहे. चित्रफिती, पॉडकास्ट, मुलाखती आणि संवादात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातूनही नागरिकांपर्यंत अभियानाचा संदेश पोहोचविण्यात येईल.डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्यासाठी 'डिजिटल रविदास ६५०', ई-ग्रंथालय, डिजिटल प्रश्नमंजुषा आणि ६५० प्रेरणादायी व्हिडिओ कथांचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विविध प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून संत रविदास महाराजांचे विचार, सामाजिक समतेचा संदेश आणि अभियानातील उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.या अभियानाचा राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम १३ व १४ फेब्रुवारी २०२७ रोजी नाशिक येथे प्रस्तावित आहे. या कार्यक्रमात बेगमपुरा संकल्पना, संत संगम, सांस्कृतिक कार्यक्रम, समता महामंच, संत रविदास वारसा प्रदर्शन, संवाद केंद्र आणि सामुदायिक अन्नसेवा यांचा समावेश असेल.

मुख्य कार्यक्रमानंतर 'समाजकुंभ' उपक्रमाच्या माध्यमातून विविध सामाजिक व धार्मिक परंपरांना एकत्र आणून समता, बंधुता, सामाजिक एकात्मता आणि मानवतेच्या विचारांचा प्रसार करण्यासंदर्भातील नियोजन करण्यात आले.

दुष्काळामुळे आमदार प्रदीप जैस्वाल वाढदिवस साजरा करणार नाहीत

शेतकरी, विद्यार्थी व गरजूंना मदतीचा हात देण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थिती आणि संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांची परिस्थिती लक्षात घेऊन मध्य विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आमदार प्रदीप जैस्वाल यांनी यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. २८ ऑक्टोबर रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोणताही उत्सव, सार्वजनिक कार्यक्रम अथवा सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार नाही.

आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी शिवसेना पदाधिकारी आणि मित्रमंडळांच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक व लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि नागरिक विविध संकटांना सामोरे जात असल्याने उत्सवी वातावरण निर्माण करणे योग्य ठरणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

वाढदिवसानिमित्त मोठे सत्कार, हारतुरे आणि अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, शेतकऱ्यांना आवश्यक मदत तसेच गरजू नागरिकांना मदतीचा हात द्यावा. वाढदिवस साजरा करण्याऐवजी समाजोपयोगी उपक्रम राबवावेत, असे आवाहन जैस्वाल यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्रमंडळांना केले आहे.

शेतकरी आणि गरजूंना मदत करण्याचे काम मात्र सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वाढदिवसाचा खरा आनंद सत्कारात नसून गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या समाधानात आहे. नागरिकांनी दिलेले प्रेम, आशीर्वाद आणि शुभेच्छा हीच आपल्यासाठी मोठी ऊर्जा असल्याची भावना आमदार प्रदीप जैस्वाल यांनी व्यक्त केली.

हिमाचल प्रदेशात पॅराग्लायडिंगचा भीषण अपघात; बल्गेरियन पायलटचा मृत्यू

मुंबई : हिमाचल प्रदेशातील कांग्रा जिल्ह्यातील धर्मशाला परिसरात पॅराग्लायडिंगदरम्यान झालेल्या अपघातात बल्गेरियन पायलटचा मृत्यू झाला आहे. मॅक्सिम व्हॅलेंटिनोविच गॅब्रिलिचेन्को (47) असे मृत पायलटचे नाव आहे. या अपघातात त्यांच्यासोबत असलेले ब्रिटिश पायलट स्टीफन अँटनी पर्डी (63) यांना सुखरूप वाचवण्यात आले. खनियारा-योल परिसरातील रायझिंग स्टार शिखराजवळ ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही पायलट बीर-बिलिंग येथून पॅराग्लायडिंगसाठी उड्डाण केल्यानंतर खनियारा-योल परिसरात पोहोचले. रविवारी दुपारी 3 ते 3.30 वाजण्याच्या सुमारास रायझिंग स्टार शिखराजवळ त्यांचे पॅराग्लायडर कोसळल्याचे सांगण्यात येत आहे. जोरदार वाऱ्यामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) आणि स्थानिक बचाव पथकाने संयुक्तपणे शोधमोहीम सुरू केली. रात्री सुमारे 9 वाजता बचाव पथक घटनास्थळी रवाना झाले. दुर्गम भागातील परिस्थितीमुळे रात्रभर शोधमोहीम सुरू ठेवण्यात आली. सोमवारी सकाळी सुमारे 10 वाजता बचावकार्य पूर्ण झाले. या मोहिमेदरम्यान मॅक्सिम यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले, तर स्टीफन अँटनी पर्डी यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. मृतदेह शवविच्छेदनासाठी धर्मशाला येथील विभागीय रुग्णालयात ठेवण्यात आल्याची माहिती आहे.

कांग्रा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक कुलभूषण वर्मा यांनी घटनेला दुजोरा दिला. या प्रकरणात आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या हवामानामुळे आणि जोरदार वाऱ्यांमुळे पॅराग्लायडिंगच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जिल्हा प्रशासनाकडून खराब हवामानात उड्डाण न करण्याच्या सूचना पायलट्सना वारंवार दिल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. मॅक्सिम हे 7 ऑक्टोबर 2026 रोजी पर्यटक व्हिसावर भारतात आले होते, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

गुणवत्तापूर्ण औषधांसाठी आरोग्य विभागाची ड्रग डिटेक्शन मशीन : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

२ मिनिटात तपासणार औषधाची गुणवता, ८ विभागात कार्यान्वित

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देताना डॉक्टरांची उपलब्धता, पायाभूत सुविधा आणि औषधांचा पुरवठा यांच्याइतकेच औषधांचे गुणवत्ता नियंत्रण महत्त्वाचे आहे. नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांमधून गुणवत्तापूर्ण औषधांचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यातील आठ विभागांत आधुनिक औषध शोध यंत्र (ड्रग डिटेक्शन मशीन) कार्यान्वित केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाला पुरवठा होत असलेली औषधे गुणवत्तापूर्ण असावीत यासाठी पहिल्यांदाच ड्रग डिटेक्शन यंत्रणा वापरण्यात येत असल्याचे सार्वजनीक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या यंत्रणेच्या माध्यमातून औषधांच्या नमुन्यांची प्राथमिक तपासणी करून संशयित अथवा गुणवत्तेबाबत त्रुटी आढळणारे नमुने पुढील प्रयोगशाळीय पडताळणीसाठी पाठविण्यात येणार आहेत.औषध खरेदी आणि पुरवठा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नियमित देखरेख निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे श्री. आबिटकर म्हणाले.

आरोग्य भवन येथे आज आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ. संजय काटकर, डॉ. सुनील भोकरे उपस्थित होते. यावेळी औषध शोध यंत्राचे प्रात्यक्षिक देण्यात आले. सदर यंत्र भारतीय नोबेल विजेते शास्त्रज्ञ सर. सी. व्ही. रमण यांच्या रमण इफेक्टवर काम करते.

नागरिकांपर्यंत गुणवत्तापूर्ण औषधे पोहोचावीत, या उद्देशाने वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणासह सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध यंत्रणांमार्फत होणाऱ्या औषध खरेदीची सातत्याने तपासणी करण्यात येणार आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतरच तपासणी करण्याऐवजी औषध पुरवठ्याच्या संपूर्ण प्रक्रियेवर नियमित आणि अचानक नमुना तपासणीद्वारे देखरेख ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

विभागाच्या वतीने अशा स्वरूपाची औषध शोध यंत्रणा सुरू करण्यात आली असून, राज्यातील आठ विभागांमध्ये यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एका यंत्राची किंमत १ कोटी २० लक्ष रुपये असून यावर २ मिनिटाअ या यंत्रांच्या वापरासाठी स्वतंत्र आस्थापना आणि मानक कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे. या माध्यमातून प्रत्यक्ष आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या औषधांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येणार असून, औषधांच्या गुणवत्तेबाबत तातडीने प्राथमिक निरीक्षण नोंदविणे शक्य होणार आहे.

औषध शोध यंत्रणा वापरण्यासाठी आठ विभागांसाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, प्रत्येक विभागात दोन सदस्यांचे पथक कार्यरत राहणार आहे. एकूण १६ जणांच्या मनुष्यबळामध्ये अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असून, ही पथके आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार आहेत. पथकातील सर्व अधिकाऱ्यांना यंत्राच्या वापराबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले असून, आठ विभागांतील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.

या पथकांकडून दर महिन्याला यादृच्छिक पद्धतीने सर्वेक्षण आणि नमुना तपासणी करण्यात येणार आहे. जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील अन्य आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध औषधांचे नमुने तपासण्यात येतील. वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, जिल्हास्तरीय यंत्रणा, स्थानिक निधी आणि स्थानिक खरेदीच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या औषधांचाही तपासणीत समावेश आहे. शासकीय रुग्णालयांसाठी खरेदी करून पुरविण्यात येणाऱ्या सर्व औषधांच्या गुणवत्तेची तपासणी करणे ही या यंत्रणेची प्रमुख जबाबदारी असणार आहे.

निविदा प्रक्रियेदरम्यान सादर करण्यात आलेल्या औषधांच्या नमुन्यांमध्ये आणि प्रत्यक्ष पुरवठा करण्यात आलेल्या औषधांमध्ये काही फरक असल्यास तोही या तपासणीतून निदर्शनास येऊ शकणार आहे. त्यामुळे पुरवठा टप्प्यावर औषधांच्या दर्जात बदल, गुणवत्तेतील तफावत अथवा अन्य अनियमितता आढळल्यास त्याची नोंद घेणे शक्य होणार आहे. अशा प्रकारच्या तपासणीमुळे औषध पुरवठा करणाऱ्या संबंधित घटकांकडून अधिक जबाबदारीने काम होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

औषध शोध यंत्राद्वारे साधारण दोन ते तीन मिनिटांत एका नमुन्याबाबत प्राथमिक निरीक्षण नोंदविणे शक्य होणार आहे. विभागीय स्तरावरील यंत्रांच्या माध्यमातून तीन ते चार जिल्ह्यांतील अनेक आरोग्य संस्थांमधील तपासणी अल्प कालावधीत पूर्ण करता येईल, असे विभागाने नमूद केले आहे. तपासणीदरम्यान नमुन्याबाबत नकारात्मक अथवा संशयास्पद निष्कर्ष आढळल्यास त्याची नोंद करून त्याची प्रत संबंधित अधिकाऱ्यांकडे देण्यात येईल. ही प्राथमिक तपासणी अंतिम मानली जाणार नसून, संबंधित नमुना पुढील पडताळणीसाठी बाह्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येणार आहे.

राज्यात अशा तपासणीसाठी शासनमान्य १२ प्रयोगशाळा उपलब्ध असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. नमुना प्रयोगशाळेकडे पाठविल्यानंतर तपासणी अहवाल वेळेत उपलब्ध व्हावेत, यासाठी संबंधित प्रयोगशाळांशी संवाद साधण्यात आला आहे. नमुना पाठविल्यानंतर साधारण आठ दिवसांत तपासणी अहवाल प्राप्त होतील, अशी अपेक्षा विभागाने व्यक्त केली आहे. प्रयोगशाळीय निष्कर्षानंतर आवश्यक माहिती ऑनलाइन अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

प्रयोगशाळीय तपासणीत औषधाच्या गुणवत्तेबाबत त्रुटी, बनावटपणा अथवा अन्य नियमबाह्य बाबी निदर्शनास आल्यास प्रचलित नियम आणि प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. अशी बाब संबंधित यंत्रणेच्या निदर्शनास आणून देणे तसेच नियमानुसार कारवाईसाठी आग्रह धरणे ही सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. औषधांबाबत प्रत्यक्ष नियामक कारवाई अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत येत असली, तरी संशयित नमुन्यांची माहिती संबंधित यंत्रणेपर्यंत पोहोचविणे आणि कार्यवाहीसाठी पाठपुरावा करणे ही सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही तपासणी सध्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व रुग्णालयांसाठी विभागाने खरेदी केलेल्या औषधांपुरती मर्यादित राहणार असून, बिगरशासकीय रुग्णालयांशी संबंधित विषय अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत असल्याचे स्पष्ट करण्यात आले औषध तपासणी आणि बनावट औषध शोधण्यासाठी जगभरातील विविध नियामक यंत्रणांकडून त्याचा वापर केला जात असल्याची माहिती देण्यात आली आहे. अमेरिका, युनायटेड किंग्डम, जर्मनी, स्वित्झर्लंड, नायजेरिया, केनिया, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियासह जगातील सुमारे ५० देशांत अशा प्रकारची उपकरणे वापरली जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. राज्यातील सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये या तंत्रज्ञानाचा उपयोग करून औषध पुरवठ्याची गुणवत्ता अधिक सक्षमपणे तपासण्याचा विभागाचा प्रयत्न आहे.

आरोग्य संवाद यात्रा

आरोग्य सेवा अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आरोग्य संवाद यात्रेचीही सुरुवात करण्यात आली आहे. या यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या आरोग्य सेवांचा नागरिकांना होणारा उपयोग जाणून घेणे, गाव-वाडी पातळीवरील नागरिकांशी संवाद साधणे आणि प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे आवश्यक सुधारणा करणे, हा उद्देश आहे. आरोग्य यंत्रणेतील चांगल्या उपक्रमांची व्यापक अंमलबजावणी करण्याबरोबरच उपलब्ध सेवांतील उणिवांवरही कार्यवाही करण्यात येणार आहे.

राज्यात आरोग्य केंद्रे विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले असून, या केंद्रांमध्ये औषधे, इंजेक्शन आणि डे-केअर सुविधांसह विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. नागरिकांना स्थानिक पातळीवरच औषधोपचार, डॉक्टरांची सेवा आणि आवश्यक डे-केअर सुविधा मिळाव्यात, यासाठी आरोग्य केंद्रांची क्षमता वाढविण्यात येत आहे.

१४४० डॉक्टरांना एकाचवेळी नियुक्तीपत्रे

आरोग्य सेवांमधील मनुष्यबळ अधिक सक्षम करण्यासाठी ४ नोव्हेंबरला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण येथे १४४० डॉक्टरांना एकाचवेळी नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहे. पुढील टप्प्यात १,९०० कम्युनिटी हेल्थ ऑफिसर नियुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. संबंधित परीक्षेची प्रक्रिया २५ ऑक्टोबरला पूर्ण झाल्यानंतर पुढील आठ ते १५ दिवसांत नियुक्तिपत्रे देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या नियुक्त्यांमुळे राज्यातील दुर्गम, आदिवासी, कोकण आणि ग्रामीण भागातील उपकेंद्र स्तरावरील आरोग्य सेवा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर १५ हजार कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांना अधिसंख्य पदावर सामावून घेतले जाणार आहे.

आरोग्य सुविधा बळकट करण्याच्या प्रयत्नांतर्गत १५ ऑगस्टला १२५ आरोग्य संस्थांचे लोकार्पण करण्यात आले आहे. आरोग्य संवाद अभियानांतर्गत आणखी १२५ संस्थांचे लोकार्पण करण्याचे नियोजन असून, त्यात जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, चाचणी सुविधा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समावेश असणार आहे. आरोग्य सेवा केवळ उपलब्ध करून न देता त्या दर्जेदार, नियमित आणि नागरिकांच्या गरजांनुसार मिळाव्यात, यासाठी पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण सेवांची सांगड घालण्यात येत आहे.

तालुका आणि विधानसभा मतदारसंघनिहाय आरोग्यवर्धिनी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांमध्ये आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच सरपंचांचा सहभाग राहणार आहे. संबंधित आमदारांनी दर तीन महिन्यांनी आरोग्य सेवांचा आढावा घ्यावा आणि त्या आढाव्यातून निदर्शनास येणाऱ्या उणिवांबाबत कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या आढाव्यांच्या आधारे मंत्रालय स्तरावर मंत्री, राज्यमंत्री आणि सचिवांकडून दर सहा महिन्यांनी परीक्षण करण्यात येणार असून, आवश्यक सुधारणा व पुढील कार्यवाही निश्चित करण्यात येईल.

ग्रामस्तरीय जनआरोग्य समित्या, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, उपकेंद्र समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालयांशी संबंधित समित्यांना ऑनलाइन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून समिती सदस्य आणि नागरिकांना आरोग्य सेवांतील त्रुटी अथवा अडचणींबाबत तक्रारी नोंदविता येणार आहेत. प्राप्त तक्रारींच्या आधारे संबंधित यंत्रणांकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. या वर्षात १० लाख जनआरोग्य समिती सदस्य जोडण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, आतापर्यंत साडेसहा ते सात लाख सदस्य जोडले गेल्याचे त्यांनी नमुद केले.

महात्मा फुले आरोग्य योजनेअंतर्गत महागड्या पेट स्कॅन सुविधेचा समावेश करण्यात आला आहे. या सुविधेसाठी रुग्णांकडून रुग्णालयाने कोणतीही रक्कम घेऊ नये, अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीत अनियमितता करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून, नागरिकांच्या स्वतःच्या खिशातून होणारा आरोग्यखर्च कमी करणे हा या उपक्रमांचा व्यापक उद्देश आहे. औषध खरेदी आणि अन्य कामकाजामध्ये पारदर्शकता वाढविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागात ई यंत्रणा उभारण्याचे कामही

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

एसबीआय लाईफचे 'वेव्हर ऑफ प्रीमियम' रायडर लाँच

मुंबई : भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या 'एसबीआय लाईफ इन्शुरन्स' ने 'वेव्हर ऑफ प्रीमियम' रायडर लाँच केला आहे. गंभीर आजार किंवा अपंगत्वासारख्या आयुष्यातील अनपेक्षित अडचणींमुळे पॉलिसीधारकाच्या दीर्घकालीन आर्थिक नियोजनावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, अशा प्रकारे हा रायडर तयार करण्यात आला आहेआर्थिक नियोजन हे मुळातच दीर्घकालीन असते, ज्यामध्ये अनेक वर्षांपर्यंतच्या जबाबदाऱ्यांचा समावेश असू शकतो. मुलांचे शिक्षण, निवृत्तीची तयारी, प्रियजनांसाठी आर्थिक सुरक्षा निर्माण करणे किंवा इतर महत्त्वाच्या आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करणे—यांसारख्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केवळ सुरक्षा असणेच पुरेसे नाही, तर दीर्घकाळपर्यंत आर्थिक जबाबदाऱ्या निभावण्याची क्षमता असणेही आवश्यक आहे.

एंटाला इंडस्ट्रीजचा आयपीओ 29 ऑक्टोबरला खुला

छत्रपती संभाजीनगर : राजकोटस्थित बीओपीपी लॅमिनेटेड बॅग्ज आणि पॉलीप्रॉपिलीन विणलेल्या पॅकेजिंग उत्पादनांची उत्पादक कंपनी, एंटाला इंडस्ट्रीज लिमिटेड, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी ₹२३.३३ कोटींचा आपला प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव सादर करत आहे. हा बुक-बिल्ट इश्यू पूर्णपणे ३४.८२ लाख नवीन इक्विटी शेअर्सचा असेल आणि तो २ नोव्हेंबर २०२६ रोजी बंद होईल. कंपनी आपले शेअर्स बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव देत आहे, ज्याची संभाव्य सूची तारीख ५ नोव्हेंबर २०२६ आहे.आयपीओची किंमत प्रति इक्विटी शेअर ₹६३–₹६७ निश्चित करण्यात आली असून, लॉट साईज २,००० शेअर्सचा आहे. किरकोळ गुंतवणूकदार किंमत पट्ट्याच्या वरच्या मर्यादेतील किमान ४,००० शेअर्ससाठी ₹२,६८,००० च्या अर्ज रकमेसह अर्ज करू शकतात. शेअर्सचे वाटप ३ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम होण्याची अपेक्षा आहे. वत्सा कॅपिटल व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड या इश्यूसाठी बुक-रनिंग लीड मॅनेजर आहे, तर बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड रजिस्ट्रार आहे.

फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोनची सुरुवात

मुंबई - एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे प्रथमच अनोख्या अशा फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन या नाविन्यपूर्ण ऑटो कार लोनची सुरुवात केली असून ही योजना विशेषरुपाने इलेक्ट्रिक व्हेईकल्स (ईव्हीज) च्या खरेदीसाठी अर्थपुरवठा करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन या योजने अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांच्या बॉडी आणि बॅटरी साठी वेगवेगळ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. यामध्ये बॅटरी वरील कर्ज हे फेडण्यासाठी ग्राहकांना अधिक कालावधी मिळणार आहे. यामुळे ग्राहकांना ईएमआय अधिक चांगल्या प्रकारे भरणे शक्य होणार आहे. ही कर्ज उत्पादन सुविधा बँकेच्या संपूर्ण भारतात असलेल्या ९७०० हून अधिक शाखांमध्ये उपलब्ध असणार आहे.

गोदरेज कॅपिटलतर्फे व्यवसायाचा विस्तार

छत्रपती संभाजीनगर : गोदरेज इंडस्ट्रीज समूहाची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने आपली उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे व्यवसायाचा विस्तार करून कंपनीने राज्यातील टियर-2 शहरांवर आणि उदयोन्मुख निवासी सूक्ष्म बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करण्याची आपली भूमिका अधिक बळकट केली आहे.पुणे–छत्रपती संभाजीनगर द्रुतगती महामार्गाच्या कामातील प्रगतीमुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये निवासी आणि आर्थिक घडामोडींना अधिक गती मिळत आहे. या महामार्गामुळे प्रादेशिक दळणवळणात लक्षणीय सुधारणा होण्याची आणि महाराष्ट्रातील व्यापक विकास कॉरिडॉरशी शहराची जोड अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे. दळणवळणाच्या सुविधा सुधारल्यामुळे निवासी मालमत्तांमधील स्वारस्य आणि स्थानिक आर्थिक व्यवहारांमध्ये वाढ होत आहे

मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये संसर्ग प्रतिबंध सप्ताह साजरा

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : मेडिकव्हर हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे २१ ते २३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आंतरराष्ट्रीय संसर्ग प्रतिबंध सप्ताह विविध शैक्षणिक, नावीन्यपूर्ण आणि जनजागृतीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. संसर्ग प्रतिबंधाचा इतिहास, वर्तमानातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांचे योगदान आणि भविष्यातील सुरक्षित आरोग्यसेवा यांचे महत्त्व या सप्ताहातून अधोरेखित करण्यात आले.या सप्ताहाचा मुख्य उद्देश रुग्णालयातील संसर्ग रोखणे, रुग्ण व आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि संसर्ग प्रतिबंधाबाबत सर्वांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होय.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे रुग्णालयातील विविध विभागांनी उभारलेले संसर्ग प्रतिबंध जनजागृती प्रदर्शनी. विविध विभागांनी त्यांच्या कामकाजाशी संबंधित संसर्ग प्रतिबंधक उपाययोजना, सुरक्षित कार्यपद्धती आणि रुग्णसेवेतील महत्त्वपूर्ण खबरदारी यांचे सादरीकरण केले. या प्रदर्शनीच्या माध्यमातून हातांची स्वच्छता, वैयक्तिक सुरक्षा साधनांचा योग्य वापर, जैववैद्यकीय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, सुरक्षित इंजेक्शन पद्धती, उपकरणांची निर्जंतुकीकरण प्रक्रिया, रुग्णालयीन संसर्ग प्रतिबंधक बंडल्स आणि पर्यावरणीय स्वच्छता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर जनजागृती करण्यात आली.

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्सच्या हाती 973 कोटींची बहुवर्षीय संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर

मुंबई : सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेडला ('सिग्मा') नाटो देशातील एका ग्राहकासाठी १५५ मिमी तोफगोळ्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'बेस ब्लीड' (बीबी) युनिट्सचे उत्पादन आणि पुरवठा करण्याची ऑर्डर मिळाली आहे. या ऑर्डरचे मूल्य १०२.२३ दशलक्ष अमेरिकी डॉलर (सुमारे ९७३.६४ कोटी रुपये) असून, ती १२ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. १५५ मिमी तोफगोळ्यांच्या संपूर्ण उत्पादन मूल्यसाखळीत आपली क्षमता विस्तारण्याच्या कंपनीच्या धोरणातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. सिग्मा आपल्या संरक्षण उत्पादन क्षमतांचा विस्तार करत असताना, बेस ब्लीड युनिट्सच्या समावेशामुळे १५५ मिमी तोफगोळे आणि फ्यूज निर्मितीतील कंपनीच्या विद्यमान क्षमतांना आणखी बळ मिळणार आहे. उत्पादन कौशल्य अधिक विकसित करणे, उत्पादन श्रेणीचा विस्तार करणे आणि जागतिक तोफखाना दारुगोळा बाजारपेठेसाठी अधिक एकात्मिक उपाय उपलब्ध करून देणे, या कंपनीच्या धोरणाला यामुळे चालना मिळणार आहे. बेस ब्लीड युनिट हा तोफगोळ्याच्या उड्डाणादरम्यान हवेचा प्रतिकार कमी करण्यासाठी वापरला जाणारा विशेष घटक आहे. तो तोफगोळ्याच्या मागील बाजूस बसवला जातो आणि नियंत्रित वायुप्रवाह निर्माण करून गोळ्याच्या मागे तयार होणारा कमी दाबाचा प्रदेश कमी करण्यास मदत करतो. परिणामी, हवेचा प्रतिकार कमी होतो आणि तोफगोळ्याची मारक पल्ल्याची क्षमता वाढते. आधुनिक १५५ मिमी तोफखाना दारुगोळ्यामध्ये या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. लांब पल्ल्याच्या तोफखाना प्रणालींची कार्यक्षमता वाढवण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते.

शोभा रियल्टीने जागतिक विकासाच्या योजनांवर प्रकाश

मुंबई : संयुक्त अरब अमिरातीस्थित एक अग्रगण्य जागतिक लक्झरी रिअल इस्टेट डेव्हलपर असलेल्या शोभा रियल्टीने, मुंबईत आयोजित आईफा पत्रकार परिषदेत अबू धाबीमधील आपला धोरणात्मक विस्तार आणि वाढत्या आंतरराष्ट्रीय विस्तारावर प्रकाश टाकला. ही कंपनी यूएई मध्ये आपली उपस्थिती मजबूत करत आहे आणि अमेरिका व ऑस्ट्रेलियासारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये विस्तार करत आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा 24 वा हप्ता 30 ऑक्टोबरला वितरित होणार

राज्यातील 91.13 लाख शेतकरी कुटुंबांच्या खात्यात 1,835 कोटी रुपये जमा होणार

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२६ या कालावधीतील २४ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवार, (दि. ३०) रोजी गुजरातमधील बनासकांठा येथून वितरित करण्यात येणार आहे. या निमित्ताने केंद्र शासनाने ३० ऑक्टोबर हा दिवस देशभरात 'पीएम किसान उत्सव दिन' म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे.

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार देण्यासाठी केंद्र शासनाने फेब्रुवारी २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली. या योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये तीन समान हप्त्यांमध्ये, म्हणजेच प्रत्येकी दोन हजार रुपये याप्रमाणे, आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) जमा केले जातात. राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापूर्वी २३ हप्त्यांद्वारे सुमारे ४२ हजार ९३५ कोटी रुपयांचा लाभ वितरित करण्यात आला आहे.

योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी जमिनीच्या अभिलेखांची नोंद अद्ययावत करणे, बँक खाते आधारशी संलग्न करणे आणि ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करणे बंधनकारक आहे. या तिन्ही अटींची पूर्तता केलेल्या राज्यातील ९१.१३ लाख शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये ३० ऑक्टोबर रोजी सुमारे १ हजार ८३५ कोटी रुपयांचा २४ वा हप्ता थेट जमा होणार आहे.

तसेच, पीएम किसान योजनेचा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी असणेही आवश्यक करण्यात आले आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक नोंदी आणि प्रमाणीकरणाची पूर्तता करावी.

'पीएम किसान उत्सव दिना'निमित्त राज्यात कृषी विभाग, महसूल व वन विभाग आणि ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. कृषी विज्ञान केंद्रे, जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यालये, ग्रामपंचायती, कृषी उत्पन्न बाजार समित्या, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक संघटना आणि प्राथमिक कृषी पतसंस्था येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केंद्र शासनाच्या https://pmindiawebcast.nic.in या संकेतस्थळावरून करण्यात येणार आहे. शेतकरी बांधव आणि भगिनींना नागरी सुविधा केंद्रांमधूनही या प्रक्षेपणात सहभागी होता येईल. राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: जिल्हास्तरीय 'धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळा'ची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक चालकांसाठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे पात्र वाहतूक चालकांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत प्रवासी वाहतूक चालकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणासाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रानुसार आणि आवश्यकतेनुसार मंडळामार्फत चालकांना जीवन विमा व अपंगत्व विमा, आरोग्यविषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास 50 हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य, पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती तसेच कामगार कौशल्य वृद्धी योजनांचा लाभ मिळणार आहे. याशिवाय, 65 वर्षांवरील रिक्षा व मीटर टॅक्सी परवानाधारक चालकांसाठी निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

तसेच नवीन ऑटोरिक्षा किंवा मीटर टॅक्सी खरेदी करण्यासाठी आणि गृहखरेदीसाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासह राज्यस्तरीय मंडळाने मान्यता दिलेल्या इतर कल्याणकारी योजनाही राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील टॅक्सी, कॅब, ॲप-आधारित ओला-उबर सेवा, पर्यटन वाहने तसेच इतर प्रवासी वाहने चालविणारे, वैध वाहनचालक अनुज्ञप्ती व बॅजधारक चालकांनी या मंडळाशी जोडले जाऊन सभासदत्व स्वीकारावे आणि उपलब्ध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने केले आहे.

इच्छुक चालकांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://ananddighek-alyankarimandal.org येथे ऑनलाइन सभासद नोंदणी करता येणार आहे. सभासद नोंदणीसाठी 500 रुपये शुल्क, तर प्रतिवर्षी 300 रुपये वार्षिक सभासद शुल्क भरणे आवश्यक आहे. प्रवासी वाहतूक चालकांनी वेळेत नोंदणी करून मंडळाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिका क्षेत्रात 2 लाख 53 हजार बालकांना जंतनाशक गोळ्या

783 शाळा, 338 अंगणवाड्यांत मोहीम; उर्वरित बालकांसाठी 3 नोव्हेंबरला मॉप-अप फेरी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे मंगळवारी (दि. २७) शहरातील शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये जंतनाशक मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २ लाख ५३ हजार ८९७ बालकांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. उर्वरित पात्र लाभार्थ्यांना ३ नोव्हेंबरला आयोजित मॉप-अप फेरीत गोळ्या देण्यात येणार आहेत.

महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला भामरे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. एक ते १९ वर्षे वयोगटातील पात्र बालकांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. शाळांमध्ये वर्गशिक्षकांच्या उपस्थितीत बालकांना गोळ्या देण्यात आल्या. बालकांमधील कृमिदोषाचे प्रमाण कमी करणे, रक्तक्षय टाळणे तसेच शारीरिक वाढ, पोषणस्थिती आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रातील ७८३ शाळा, ३३८ अंगणवाड्या, ४० आरोग्य केंद्रे आणि बाह्य लसीकरण सत्रांच्या माध्यमातून मोहिमेची अंमलबजावणी करण्यात आली.

मोहिमेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय कार्यक्रम पर्यवेक्षक डॉ. सुहास कोरे यांनी बन्सीलाल आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळा व अंगणवाड्यांना भेटी दिल्या. जंतनाशक गोळ्यांचे वितरण, बालकांना दिले जाणारे मार्गदर्शन आणि कार्यक्रमाच्या कार्यवाहीची त्यांनी पाहणी केली. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला भामरे, नोडल अधिकारी डॉ. सचिन अंभोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्याकुमार ठाकूर यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि एकात्मिक बाल विकास सेवा (आयसीडीएस) यांच्या समन्वयातून ही मोहीम राबविण्यात आली. मोहिमेतून वंचित राहिलेल्या पात्र बालकांना ३ नोव्हेंबरला किंवा दिवाळीच्या सुट्ट्यांपूर्वी अथवा शाळेच्या शेवटच्या दिवशी आयोजित मॉप-अप फेरीत जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन आहे.

एमजीएममध्ये 'ग्रीन सिंथेसिस ऑफ सिल्वर नॅनोपार्टिकल्स' पुस्तकाचे प्रकाशन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्सच्या प्राध्यापिका डॉ. रूपाली तौर आणि सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. शंतनू चव्हाण लिखित 'ग्रीन सिंथेसिस ऑफ सिल्व्हर नॅनोपार्टिकल्स - प्लांट-बेस्ड अप्रोचेस, कॅरेक्टरायझेशन अँड ॲप्लिकेशन्स' या पुस्तकाचे मंगळवारी एमजीएम विश्वस्त कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.

यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ काळे, द्वारकाभाऊ पाथ्रीकर, माजी आमदार किशोर पाटील, क्रेडाईचे उपाध्यक्ष पंजाब तौर, विलासचंद्र काबरा, पंकज नाना बोराडे, डॉ. शिव कदम, डॉ. शंतनू चव्हाण आणि लेखिका डॉ. रूपाली तौर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

हरित नॅनोतंत्रज्ञानातील संशोधनाची माहिती देणाऱ्या या पुस्तकात एकूण सहा प्रकरणांचा समावेश आहे. वनस्पतींची पाने, बिया, मुळे, फुले, साल, फळे, फळांची साले आणि मूलक्षोड अशा विविध भागांचा वापर करून चांदीचे नॅनो कण तयार करण्याच्या पद्धतींचे विवेचन करण्यात आले आहे. तसेच वनस्पतींमधील जैवरासायनिक संयुगे नॅनो कणांच्या निर्मितीत कशी भूमिका बजावतात, याची शास्त्रीय माहितीही पुस्तकात मांडण्यात आली आहे.

वनस्पतिशास्त्र, जैवतंत्रज्ञान, पदार्थविज्ञान, हरित रसायनशास्त्र आणि पर्यावरणविज्ञान या क्षेत्रांतील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक उपयुक्त संदर्भसाहित्य ठरणार आहे. वनस्पतींच्या जैविक क्षमतेचा उपयोग करून शाश्वत व पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दृष्टीने या संशोधनपर पुस्तकाचे महत्त्व आहे.

28 ऑक्टोबर रोजी हिंगोली व नांदेड जिल्हयात तर 29 रोजी जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी **दिनांक 28 ऑक्टोबर रोजी परभणी जिल्हयात तर दिनांक 29 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर जिल्हयात विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम तर दिनांक 28 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर, लातूर, जालना, धाराशिव जिल्हयात तर दिनांक 29 ऑक्टोबर रोजी परभणी, बीड जिल्हयात तर दिनांक 30 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी व बीड जिल्हयात तूरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक 29 व 30 ऑक्टोबर रोजी हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्हयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील 24 तासात कमाल तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही व त्यानंतर 24 ते 48 तासात 2 ते 3 अं.से. ने घट होऊन त्यानंतर वाढ होण्याची शक्यता आहे तर पुढील 24 तासात किमान तापमानात 2 ते 3 अं.से. ने वाढ होऊन त्यानंतर 24 ते 48 तासात 2 ते 3 अं.से. ने घट होऊन त्यानंतर 1 ते 2 अं.से. ने वाढ होण्याची शक्यता आहे.

हवामान सारांश / चेतावनी : प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार दिनांक 28 ऑक्टोबर रोजी हिंगोली व नांदेड जिल्हयात तर दिनांक 29 ऑक्टोबर रोजी जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी 30 ते 40 कि.मी.) राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. दिनांक 28 ऑक्टोबर रोजी परभणी जिल्हयात तर दिनांक 29 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर जिल्हयात विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम तर दिनांक 28 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर, लातूर, जालना, धाराशिव जिल्हयात तर दिनांक 29 ऑक्टोबर रोजी परभणी, बीड जिल्हयात तर दिनांक 30 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी व बीड जिल्हयात तूरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक 29 व 30 ऑक्टोबर रोजी हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्हयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

मराठवाडयात पुढील 24 तासात कमाल तापमानात फारशी तफावत जाणवनार नाही व त्यानंतर 24 ते 48 तासात 2 ते 3 अं.से. ने घट होऊन त्यानंतर वाढ होण्याची शक्यता आहे तर पुढील 24 तासात किमान तापमानात 2 ते 3 अं.से. ने वाढ होऊन त्यानंतर 24 ते 48 तासात 2 ते 3 अं.से. ने घट होऊन त्यानंतर 1 ते 2 अं.से. ने वाढ होण्याची शक्यता आहे.

सामान्य सल्ला : विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाडयात दिनांक 30 ऑक्टोबर ते 05 नोव्हेंबर दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल तापमान सरासरीएवढे ते सरासरीपेक्षा किंचित जास्त व किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.

संदेश : पिकास, बागेस, भाजीपाला व फुल पिकास आवश्यकतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. पाण्याच्या उपलब्धतेनूसार रब्बी हंगामातील पिकांची (रब्बी ज्वारी, करडई, सूर्यफूल व हरभरा) पेरणी करावी. काढणी व मळणी केलेल्या पिकाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

पुष्पक नगर येथे 10 फुटी अजगराला सर्पमित्रांकडून जीवदान



उरण दि. २७ (विठ्ठल ममताबादे) पनवेल तालुक्यातील पुष्पक नगर येथे दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी नाल्यामध्ये आढळलेल्या सुमारे १० फूट लांबीच्या इंडियन रॉक पायथन (Indian Rock Python) या अजगराला केअर ऑफ नेचरचे पनवेल विभाग प्रमुख तथा सक्रिय सदस्य तथा सर्पमित्र साजन सुनील वास्कर आणि प्रज्वल शिंदे यांनी सुरक्षितपणे रेस्क्यू केले. त्यानंतर या अजगराला नैसर्गिक अधिवास असलेल्या जंगलात सुखरूप सोडण्यात आले.

नाल्यामध्ये अजगर आढळल्याची माहिती मिळताच सर्पमित्रांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेतली. अजगराला कोणतीही इजा होऊ न देता काळजीपूर्वक पकडून त्याची सुरक्षित सुटका करण्यात आली. त्यानंतर त्याला जंगलात नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

केअर ऑफ नेचरचे पनवेल विभाग प्रमुख तथा सर्पमित्र साजन सुनील वास्कर आणि प्रज्वल शिंदे यांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे अजगराला जीवदान मिळाले. वन्यजीवांचे संरक्षण करणे आणि साप दिसल्यास त्यांना न मारता प्रशिक्षित सर्पमित्रांची मदत घेणे आवश्यक आहे, असा संदेश सर्पमित्रांनी दिला आहे.कोणतेही साप दिसल्यास त्याला मारू नका. त्यांना नैसर्गिक अधिवासात, जंगलात सोडा असे आवाहन केअर ऑफ नेचर या पर्यावरण प्रेमी संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

बाल विद्यामंदिर शाळा येथे 'राष्ट्रीय जंतनाशक दिन' जिल्हास्तरीय शुभारंभ सोहळा संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: येथील बाल विद्यामंदिर हायस्कूल व कनिष्ठ शाळेत मा. मनपा आयुक्त श्री नितीन नार्वेकर तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ . किशोर सुरवसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रावजी सोनवणे, परभणी शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.कल्पना सावंत, प्राचार्य श्री अरुण बोराडे यांच्या उपस्थितीत आज 'राष्ट्रीय जंतनाशक दिन' मोहिमेचा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. परभणी शहरा मध्ये राष्ट्रीय जंतनाशक दिन' मोहिमेचे शहर मध्ये बालांकांचे उदिष्ट ७६०७६ आहे.

सदर सोहळ्यास सरस्वती पूजन नंतर मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. श्री. किशोर सुरवसे, परभणी शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.कल्पना सावंत यांनी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम कार्यक्रमाचे थोडक्यात प्रास्ताविक सांगितले तसेच या उद्घाटन सोहळ्यात प्रामुख्याने सन्माननीय उपस्थित श्री नितीन नार्वेकर सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देऊन मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. कुपोषणावर मात करण्यासाठी ही जंतनाशक मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. या मोहिमेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा आणि पालकांनीही यासाठी सहकार्य करावे असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी व आरोग्य प्रशासनाच्या वतीने यावेळी करण्यात आले.

यावेळी डॉ. नाहीद फातेमा वैद्यकीय अधिकारी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, श्री. गजानन जाधव शहर कार्यक्रम व्यवस्थापक, शाळेचे शिक्षक वृंद, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वनामकृवित महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त सोमवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील विद्यापीठाच्या सिम्पोजियम सभागृहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव श्री. पुरभा काळे यांच्या हस्ते महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी उपकुलसचिव (सामान्य प्रशासन) श्री. पद्माकर पाटील यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनकार्याची व योगदानाची माहिती उपस्थितांना दिली. महर्षी वाल्मिकी यांच्या विचारांचे स्मरण करून उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

या कार्यक्रमास विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील विविध कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी तसेच महिला कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

घाटीत महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त महाआरती



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे आद्यकवी महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त घाटी परिसरात अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त दरवर्षी आयोजित या कार्यक्रमातून सामाजिक एकोपा वृद्धिंगत करण्यासह महर्षी वाल्मिकी यांच्या विचारांचे स्मरण केले जाते. या उपक्रमातून सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र पोहाल, विशाल चारण, अमोल पाखरे, करण पोहाल, शेरखान, अनिकेत रगडे, राह

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मोठं गिफ्ट! मंत्रिमंडळाच्या बैठकीत एकाचवेळी 12 महत्त्वाचे निर्णय

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १२ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शेतकऱ्यांना ५ हजारांची दुष्काळी मदत, त्याशिवाय, पुणे लोहगाव येथे दिल्लीच्या 'भारत मंडपम'च्या धर्तीवर राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शन केंद्र उभारणे, सिंधुदुर्गमधील चिपी विमानतळ सेवा नव्या दमाने सुरू करणे, आणि ई-व्हेईकल उद्योगाला प्रोत्साहन देण्यासह राज्यातील विविध विकासकामांवर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त३०४ तालुक्यातील दिड कोटी शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी पाच हजार रुपयांचा अग्रीम मिळणार. पिकांचे ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट अग्रीम मिळणार. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट डीबीटी द्वारे अग्रीम जमा होणार. (मदत व पुनर्वसन विभाग)

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना विकसित भारत - जी राम जी योजनेसोबतच विविध योजनांच्या समन्वयातून सुरु ठेवली जाणार. या राज्यस्तरीय योजनेस जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून कामे करता येणार, त्यासाठी योजनेला जिल्हास्तरीय योजना म्हणूनही मान्यता. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविण्यासाठी राज्यस्तरीय समितीला अधिकार देण्यास मंजुरी (रोजगार हमी योजना विभाग)

राज्यातील दिव्यांग जनांच्या कल्याणासाठी महत्वाचे पाऊल. दिव्यांगांसाठीच्या कल्याण, पुनर्वसन व सक्षमीकरणाकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत एक टक्के निधीचा वापर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी. (दिव्यांग सक्षमीकरण विभाग)

जलसंपदाविभागाचा ३९ हजार ७२२ पदांचा आकृतीबंध मंजूर. पाच महामंडळासह, क्षेत्रिय कार्यालयांकरिता सुधारीत आकृतिबंध निश्चित. नवीन यंत्रणा, कार्यलयांची पुनर्रचना. सन २०१६ अखेरपर्यंत सिंचनाखाली असलेल्या ४५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये १३ लाख हेक्टरची वाढ. सन २०२५ अखेरपर्यंत ५८ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली. वाढीव क्षेत्राच्या व्यवस्थापनाकरिता



१३४० सिंचन शाखा व वाढीव ११० सिंचन शाखा अशा एकूण १४५० सिंचन शाखा कार्यालयासाठी पदनिर्मिती. पाच महामंडळांसाठी भूसंपादन तज्ज्ञ, कृषी विषयक तज्ज्ञ, सामाजिक बदल तज्ज्ञ असे तीन नवीन संवर्ग, अशा एकूण पंधरा कार्यकारी अभियंता दर्जाच्या पदांची निर्मिती. तर काही पदांचे एकत्रीकरण करून सिंचन सहायक नवीन संवर्ग निर्माण करण्यास मंजुरी. (जलसंपदा विभाग)

पुण्यातील लोहगाव येथे भारत मंडपमच्या उभारणीस गती मिळणार. पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील लोहगाव येथील खेळाचे मैदानाच्या आरक्षणात बदल करून या ठिकाणी नवी दिल्लीतील भारत मंडपमच्या धर्तीवर राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शन केंद्र होणार. (नगर विकास)

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत बजाज ऑटो लिमिटेड कंपनीला ई-व्हेईकल निर्मितीसाठी ६६ कोटी ८२ लाख रुपये देण्यास मंजुरी. (परिवहन विभाग)

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळासाठीची विमान सेवा नव्या दमाने सुरु होणार. नवी मुंबई चिपी(सिंधुदुर्ग)- नवी मुंबई आणि नवी मुंबई-चिपी (सिंधुदुर्ग) हवाई मार्गाकरिता विमान कंपन्यांना शंभर टक्के (व्यवहार्यता तफावत निधी - Viability Gap Funding) निधी देण्यास मंजुरी. (सामान्य प्रशासन- विमानचालन विभाग)

लातूर जिल्ह्यातील शिरूर ताजबंद (ता. अहमदपूर) येथील मल्हारराव होळकर भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणीला शासन अर्थसहाय्य मिळणार. (वस्त्रोद्योग विभाग)

महाराष्ट्र सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरण (पीपीपी) मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी. प्रकल्पांची छाननी, तत्वतः मान्यता, प्रस्तावासाठी विनंती, व्यवहार संरचना, निविदा प्रक्रीया व बोली या टप्प्यांचे सुनियोजन होणार. (नियोजन विभाग)

राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये आता सहायक प्रशासन अधिकारी असे एकच पद राहणार. लिपिकवर्गीय गट-क संवर्गातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी (एस - १३) आणि सहायक प्रशासन अधिकारी (एस-१४) हे दोन संवर्ग एकत्रित करण्यात येणार. त्यामुळे सहायक प्रशासन अधिकारी (एस-१४) असा एकच संवर्ग राहणार. (ग्राम विकास विभाग)

धुळे जिल्ह्यातील मौजे रावेर येथील जमीन एमआयडीसीली देण्यास मंजुरी. रावेर येथील २८९ हेक्टर ६९आर जमीन प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, धुळे यांना एमआयडीसीच्या विस्तारासाठी उपलब्ध करुन देण्यास मंजुरी. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ च्या अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी. प्र - कुलगुरू पदावरील व्यक्तीस हटविण्याचे अधिकार कुलपती यांना मिळणार. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

घाटीत अग्निसुरक्षा प्रशिक्षण; आग विझविण्याचे प्रात्यक्षिक

अधिकारी, कर्मचारी, परिचारिका व सुरक्षारक्षकांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे मंगळवारी (दि. २७) महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या वतीने अग्निसुरक्षा प्रशिक्षण व प्रात्यक्षिक घेण्यात आले. रुग्णालयात आग लागण्याच्या संभाव्य घटना टाळणे, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपाययोजना करणे आणि अग्निशमन उपकरणांचा योग्य वापर याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

महानगरपालिका अग्निशमन विभागाचे श्री. विजय राठोड व इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आग लागल्यास घ्यावयाची खबरदारी, सुरक्षितपणे बाहेर पडण्याची दक्षता,



अग्निशमन उपकरणांचा वापर तसेच अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन याबाबत माहिती देण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान आग विझविण्याचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले.

रुग्णालयात रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचाऱ्यांची मोठी वर्दळ असते. अशा ठिकाणी आगीसारखी दुर्घटना घडल्यास तत्काळ आणि योग्य प्रतिसाद देणे महत्त्वाचे असते. या पार्श्वभूमीवर संभाव्य दुर्घटनांना प्रभावीपणे सामोरे जाण्याची तयारी वाढविणे आणि अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा प्रशिक्षणाचा उद्देश होता.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. तपन जक्कल, डॉ. संकेत पाडळे, डॉ. सचिन देगावकर, डॉ. गोपाल देव्हडे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, चतुर्थश्रेणी कर्मचारी, सुरक्षारक्षक आणि रुग्णालयातील संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यात 7.58 लाख बालकांना जंतनाशक औषध

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेत 90.61 टक्के उद्दिष्टपूर्ती; वंचित बालकांसाठी 3 नोव्हेंबरला मॉप-अप डे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेत जिल्ह्यातील ७ लाख ५८ हजार ४३६ बालकांना जंतनाशक औषध देण्यात आले. जिल्ह्यात १ ते १९ वर्षे वयोगटातील ८ लाख ३६ हजार ९८५ बालकांना औषध देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ९०.६१ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली असून, औषध घेण्यापासून वंचित राहिलेल्या बालकांसाठी ३ नोव्हेंबर रोजी मॉप-अप डे राबविण्यात येणार आहे.

बालकांना जंतसंसर्गापासून संरक्षण मिळावे, त्यांचे आरोग्य व पोषण सुधारावे आणि शारीरिक तसेच बौद्धिक वाढ निरोगी व्हावी, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय व अनुदानित शाळा, खासगी शाळा,



अंगणवाडी केंद्रे आणि आरोग्य संस्थांच्या माध्यमातून पात्र बालकांना अल्बेंडाझोल औषध देण्यात आले.

मोहिमेत जिल्ह्यातील २ हजार १४७ शासकीय व अनुदानित शाळा, ५४५ खासगी शाळा आणि ३ हजार २१८ अंगणवाडी केंद्रांचा समावेश होता. शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसह अंगणवाडीतील नोंदणीकृत व अनोंदणीकृत बालके तसेच शाळाबाह्य बालकांपर्यंतही मोहीम पोहोचविण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर, फुलंब्री, गंगापूर, कन्नड, खुलताबाद, पैठण, सिल्लोड, सोयगाव आणि वैजापूर या नऊ तालुक्यांत मोहिमेची अंमलबजावणी करण्यात आली. तालुकानिहाय लाभार्थी संख्या लक्षात घेऊन औषधसाठ्याचे नियोजन करण्यात आले.

मोहिमेदरम्यान काही कारणांमुळे जंतनाशक औषध घेऊ न शकलेल्या बालकांना ३ नोव्हेंबर रोजी औषध देण्यात येणार आहे. यासाठी शाळा, अंगणवाडी आणि आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून वंचित बालकांचा शोध घेण्यात येईल. संबंधित बालकांनी मॉप-अप डेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागासह शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, शाळा व्यवस्थापन, शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम केले. जिल्ह्यात ९०.६१ टक्के उद्दिष्टपूर्ती झाल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी दिली.

दरोडा घालण्याच्या तयारीत तसेच बनावट नोटा देऊन फसवणूक करण्याच्या तयारीत असलेली आंतरजिल्हा टोळी जेरबंद - 4.57 लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**परभणी जिल्ह्यात घरफोडी व चोरीच्या घटना घडत असल्याने मा. पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत व अप्पर पोलीस अधीक्षक श्री तानाजी चिखले यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली LCB चे पथक परभणी शहरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जिंतूर रोडवरील पाथरी बायपास रोडवर काही इसम तोंडाला पांढरा रुमाल बांधून, हातात तलवार, लोखंडी रॉड घेऊन दरोडा टाकण्याच्या तयारीत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या आधारे LCB च्या पथकाने धर्मापुरी शिवारातील जिंतूर ते पाथरी बायपास रोडवरील पुलाजवळ रात्री २२.०५ वा. सापळा रचून कारवाई केली असता तेथे अंधारात एक संशयित i20 कार थांबलेली आढळली. पोलिसांनी



शिताफीने ५ इसमांना ताब्यात घेतले.

***अटक करण्यात आलेले आरोपी** :*१) गजानन तुळशीराम इंगळे वय ४२ वर्षे रा. गोपाळनगर, खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा २) केशव अभ्याजी सरोदे वय ४५ वर्षे रा. आकोला नाका, मालेगाव ता. मालेगाव जि. वाशिम ३) किशोर वामन कांबळे वय ५० वर्षे रा. सिरपूर जैन ता. मालेगाव जि. वाशिम ४) पवन ओमप्रकाश चौधरी वय ४२ वर्षे रा. शिवाजी वेस, खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा ५) योगेश पद्माकर भोज वय २७ वर्षे रा. जालंब नाका, डीपी रोड, खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा

चौकशीत आरोपींनी बायपास रोडवरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांना अडवून लुटमार करण्याच्या व शहरात घरफोडी करण्याच्या उद्देशाने थांबल्याची कबुली दिली. तसेच स्वतःजवळ भारतीय बच्चों के बँक अशा खेळणी नोटा जवळ बाळगून त्यावर भारतीय चलनी नोटा लावून लोकांना त्या देऊन फसवणूक करणार होतो याबाबत कबुली दिली.

***जप्त करण्यात आलेला मुद्देमाल** :* - ४,००,०००/- रु. किंमतीची सिल्वर रंगाची Hyundai i20 कार - ०२ नंबर प्लेट (MH 03 BE 7219) - रोख २५००/- रुपये, एक धारदार तलवार, लोखंडी रॉड, स्क्रू ड्रायव्हर, मिरची पूडच्या ५ पुड्या, दोरी - ४८,०००/- रु. किंमतीचे ०८ मोबाईल हँडसेट (Samsung, Oppo, Motorola, Vivo, K-Touch) - नकली नोटा (भारतीय बच्चोका बँक) - *एकूण मुद्देमाल - ४,५७,५५०/- रुपये* सदर इसमांविरुद्ध पोह/१२८७ महेश कवठाळे यांच्या फिर्यादीवरून कलम ३१०(४), ३१०(५) BNS सह कलम ४, २५ शस्त्र अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे, पोलिसा अंमलदार महेश कवठाळे, राहुल परसोडे, सचिन भदर्गे , माणिक वाघ, सिध्देश्वर चाटे, नामदेव दुबे , निलपत्रेवार, राम पौळ, माहुरे, महारुद्र सपकाळ, इमरान ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक श्री. गजेंद्र सरोदे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली

संत तुकाराम विद्यालयात विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप

महानगरपालिका आरोग्य विभागाचा उपक्रम; स्वच्छतेच्या सवयी जोपासण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने डॉ. आंबेडकर नगर येथील संत तुकाराम प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ ठेवणे आणि पोटातील जंतांमुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

मध्यान्ह भोजनानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक संदिप सोनवणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. यावेळी शिक्षक साहेबराव शिंदे, सुनील चौधरी, किरणकुमार सोनवणे, विजय पाटील, हर्षल पगारे, रत्नमाला घोरपडे, शीतल घुगे, सुनीता शेजुळ तसेच महानगरपालिका आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य विभागाच्या



कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे महत्त्व समजावून सांगितले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिस्तीत गोळ्या घेण्यासाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पोटातील जंतांमुळे मुलांमध्ये अशक्तपणा, भूक कमी लागणे आणि थकवा यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर तसेच शारीरिक वाढीवर होऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी जंतनाशक मोहीम महत्त्वाची आहे.

विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले असेल, तरच त्यांचे शिक्षणात लक्ष लागते. त्यामुळे पालकांनीही मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. नियमित हात धुणे, नखे कापणे आणि स्वच्छ पाणी पिणे अशा स्वच्छतेच्या सवयी लावाव्यात, असे आवाहन मुख्याध्यापक संदिप सोनवणे यांनी केले.

उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने महानगरपालिका आरोग्य विभागाचे आणि उपस्थित कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले.

उरण महाविद्यालयात सायबर सेक्युरिटी व सामाजिक सुरक्षा या विषयावर व्याख्यान



उरण दि २७(विठ्ठल ममताबादे)कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने आयोजित सायबर सेक्युरिटी व सामाजिक सुरक्षा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले गेले या कार्यशाळेत भागुबाई चांगु ठाकूर लॉ कॉलेज पनवेलचे विद्यार्थी राहुल भालेकर, गणेश पंडित, आयुष्य तिवारी व काशिनाथ शिंगवा हे उपस्थित होते. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी विद्यार्थ्यांनी सुरक्षित ऑनलाईन व्यवहार करावा व मोबाईलचा वापर योग्य ठिकाणी व गरज असतानाच करावा असे सांगितले. कार्यक्रमात राहुल भालेकर यांनी ऑनलाइन फिशिंग विषयी सविस्तर माहिती दिली. तर गणेश पंडित, आयुष तिवारी व काशिनाथ शिंगवा यांनी ऑनलाइन हॅकिंग, सोशल मीडिया, फोटो मार्फिन, कस्टमर फेक कॉल, बँक फेक कॉल व विविध फेक लिंक्स या संबंधात माहिती देऊन जागृती केली. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन व्यवहार करताना अतिशय दक्षपणे व्यवहार करावा व आपली सुरक्षा व आर्थिक फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी असे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमात माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, प्राध्यापक डॉ. ए.के. गायकवाड, प्राध्यापक डॉ.एच. के. जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार एन एस एस विद्यार्थी धनाजी नाईक यांनी मानले . कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सातवे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भव्य दिव्य संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ स्नेह शारदानगर वसमत रोड परभणी च्या वतीने प्रत्येक महिन्याच्या श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्री विष्णुसहस्त्रनाम पारायण सोहळा आणि ज्ञानेश्वरी प्रवचन सोहळा आधी कार्यक्रम दिनांक 21 ऑक्टोबर ते 27 ऑक्टोबर या सात दिवसांमध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्री विष्णुसहस्त्रनाम पाठ पारायण साडेसात ते बारा या वेळामध्ये गजानन महाराज मंदिर संस्थान व महालक्ष्मी मंदिर संस्थान सभागृह सभा मंडप स्नेह शारदानगर वसमत रोड परभणी येथे ज्ञानेश्वरी पारायण वाचन व्यासपीठ नेतृत्व ह भ प दादाराव महाराज भालके, श्रीविष्णुसहस्त्रनाम पाठ वाचन नेतृत्व विष्णू भक्त ह भ पबालाजी महाराज तुंगेनवार , भागवताचार्य



हभप एकनाथ महाराज पांचाळ यांनी व्यासपीठावर ज्ञानेश्वरी पारायण विष्णुसहस्त्रनामाचे वाचन करण्यात आले सहवाचक ज्ञानेश्वरी पारायण भक्त सोपानराव

डाळ रेणुकादास पाचपोर माणिकराव राऊत, किशनराव पोपळघट , महिला प्रतिनिधी शीला ताई कदम मालतीताई देशमुख मिराबाई लोकलवार ,रेखाताई कदम अनुसयाबाई चौके, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मुख्य यजमान यादवराव पवार सुधाकरराव देशमुख पेडगावकर श्रीमती शीलाताई देशमुख विशाल देशमुख श्रीमतीगायत्री ताई देशमुख, प्रतापराव पवार श्रीमती सुनिता ताई पवार अनिकेत पवार श्रीमती संपदा ताई पवार त्यांच्या वतीने दररोज महाप्रसाद सात दिवस यांच्या वतीने भंडारा सर्व पारायणासाठी व्यवस्था करण्यात आली होती आज काल्याचे प्रवचन ह भ प बाल चौथे महाराज यांच्या हितगुजाने पारायण सोहळा भव्य दिव्य संपन्न झाला कार्यक्रमाच्या यशस्वी साठी श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ स्नेह शारदा नगर वसमत रोड परभणी मुख्य संकल्पक विष्णू भक्त बालाजी महाराज तुंगेनवार, ज्ञानेश्वरी पारायण सेवेकरी सोपानराव डाळ रेणुकादास पाचपोर, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा नियोजक ह भ प नामदेव डाळ सर , माणिकराव राऊत पीजी देशमुख शिवाजीराव झाडे प्रभाकर देशमुख यादव पवार प्रतापराव पवार विशालराव देशमुख गजानन महाराज मंदिर अध्यक्ष चव्हाण साहेब महालक्ष्मी मंदिर अध्यक्ष ज्ञानोबा कदम मंदिराचे गुरु कालिदास गुरु भोगावकर सुरेश महाराज धावडकर प्रभाकरराव सराफ कारभारी गिराम किशनराव पोपळघट ह भ प खटिंग श्री मत्तेवार सावंत सर रणेर सर ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना महिला मंडळ चे शीला ताई कदम मालतीताई देशमुख रेखाताई कदम अनुसयाबाई चौके आशाबाई वनगुजरे शीलाताई देशमुख सुनिता ताई पवार गायत्री ताई देशमुख संपदा ताई पवार श्रीमती उमरीकर मॅडम श्रीमती डाळताई , शेंडे काकू रत्नपारखे काकू काळदाते काकू जोशी काकू कुलकर्णी काकू जाधव काकू बहुसंख्य नगरातील स्नेह नगर शारदा नगर विवेक नगर आचार्य नगर जागृती कॉलनी एकता नगर भाग्यलक्ष्मी नगर रामकृष्ण नगर शिवराम नगर वृंदावन कॉलनी गजानन नगर श्री हरी नगर कृष्णा नगर लोकमान्य नगर कृषी सारखी कॉलनी वसमत रोड परिसरातील बहुसंख्य भाविक भक्त ज्ञानेश्वरी पारायण वाचनासाठी उपस्थित होते अशी माहिती ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रचारक नितीन जाधव गोगलगावकर ज्ञानेश्वरी पारायण सेवेकरी सोपानराव डाळ विष्णू भक्त बालाजी तुंगेनवार यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911